# राष्ट्रमाता जिजाऊचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत योगदान

प्रा.सुरेश ल. पंडीत
इतिहास विभाग प्रमुख श्री.धाबेरला महाविद्यालयगडचीरोली (चां.) ता.जि. अकोला

........................................................................................................

**सारांश** :—राजमाता जिजाऊच्या एकंदरीत कार्याच्या चिकित्सक अभ्यासाअंती असे निदर्शनास येते की,छ.शिवाजी महाराजांच्या जडणघडणी मध्ये राजमातेच्या संस्काराचे योगदान लाखमोलाचे आहे.छ. शिवाजी महाराजांनी 'स्वराज्य'स्थापन करण्याचे जे कार्य केले ते कार्य निश्चितच अतुलनिय ,आकाशाला गवसणी घालणारे आहे,त्यास जगाच्या इतिहासात तोड नाही.परंतु शिवाजी राजे हे स्वयंभू आणि स्वयंम प्रकाशित होते?सूर्य जसा स्वयंम प्रकाशित असतो अगदी तसे!यावर अंधश्रध्दाळू विश्वास ठेवतात.परंतु इतिहास संशोधकाला अशा गोष्टीचा अन्वायार्थ लावतांना विवेक जागृत ठेवावा लागतो.त्यालाच तारतम्यभाव,स्थापत्यभाव, निरपेक्षपणा व वस्तुनिष्ठता अथवा शास्त्रीय दृष्टिकोन काहीही म्हणा वास्तविक कोणताही मानव प्राणी हा स्वयंम प्रकाशित नसतो.त्याच्यावर बालपणी संस्काराचे रोपन केल्या शिवाय त्याचा व्यक्तित्व विकास सहजा सहजी घडून येत नाही हे विज्ञानाने आज सिध्द केले आहे विज्ञान निष्ठा अथवा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर अगदी बालपणापासून शिवाजी महाराजांचा व्यक्तिमत्वाचा विकास हा नियोजन बध्द,जाणीवपूर्वक विशिष्ट हेतू(स्वराज्य स्थापनेचा )समोर ठेवून त्यांच्या माता पित्यांनी बालपणी शिवबावर केलेल्या संस्कारातून घडून आला हे इतिहास सिध्द आहे.

इस्लामी राजवटीत हिंदु व्यक्तिला जीवन जगणे असाहय झाले होते तत्कालीन इस्लामी राजवटीच्या अन्याय अत्याचाराने जिजामातेचे मन दु:खाने पोळून निघाले होते.तेव्हा बाल शिवाजीला इस्लामी राजवटीचे खरे स्वरूप समजावून सांगून त्यांच्या बालमनावर इस्लामी सततेबद्दल तिरस्कार निर्माण करण्याचे कार्य व 'स्वराज्य'स्थापनेची प्रेरणा महाराजांना आऊसाहेबाकडून प्राप्त झाली. माता जिजाऊ बाल शिवाजीच्या हुड स्वभावाला योग्य वळण लावण्यासाठी पराक्रमी पुरूषाच्या गाथा आणि तुकारामाचे अभंग सांगून त्याच्यात धाडस,शौर्य समता वउदारता इत्यादी गुण निर्माण केले एवढेच नव्हेतर त्यांच्या लष्करी शिक्षणात जातीने लक्ष घातले शत्रुबद्दल मानवीय दृष्टिकोन, न्यायनिष्ठुरता इत्यादी सद्‌गुण जिजामातेनेच शिवाजी महाराजांच्या अंगी रूजविले.या गुणामुळेच शिवाजी महाराज हे प्रतिकूल परिस्थितीत व कठिण आव्हाने यावर मात करून अलौकिक कार्य करू शकले. केवळ स्वराज्य स्थापन करून भागत नाही तर स्थापन केलेल्या स्वराज्याला कायदेशिरपणा, धार्मिक अधिष्ठान प्राप्त होणे गरजेचे असते. राज्याभिषेकानंतर हे धार्मिक अधिष्ठान व कायदेशिरपणा प्राप्त होणार होता. तेव्हा महारांजाना स्वराज्यभिषेक करण्याची संकल्पना जिजाऊनेच दिली होती.या मंगल सोहळयात सर्व दु:खे बाजुला सारून त्या जातीने हजर होत्या यावरून जिजाऊची स्वराज्याप्रती असलेली तळमळ दिसुन येते. उपरोक्त माहितीवरून मातोश्री जिजाऊ हयाच शिवचरित्राच्या मार्गदर्शक, संकल्पक, आधारस्तंभ, शिल्पकार, प्रेरणास्थान होत्या. त्यांच्या योगदानुसार शिवजीवनाची जडणघडण झाली.

**प्रस्तावना**:—राष्ट्रमाता म्हणुन विश्व वंदनीय असलेल्या जिजाऊ उर्फ आऊसाहेबाचे व्यक्तीमत्व व कर्तृत्व अखंड प्रेरणा स्त्रोत आहे.या व्यक्तीमत्वाची तुलना जगातील कोणत्याही स्त्री व्यक्तीमत्वाशी होऊ शकत नाही आऊसाहेबात कुशाग्र बुध्दीमत्ता,संयम,कुशल प्रशासक, न्यायप्रीयता, भविष्यवेत्ता धाडसीपणा, पुरोगामी विचार सरणी, कष्टाळूपणा, दानशुरता, व विज्ञाननिष्ठता इत्यादी सद्‌गुण होते. या सद्‌गुणांचा वारसा शिवरायांना मिळाल्यामुळे त्यांना हिंदवी स्वराज्य स्थापन करता आले व स्थापन केलेले स्वराज्य चिरकाळ टिकविता आले तसेच स्वराज्याचे सुराज्यात परिवर्तन करता आले. आऊसाहंबांना शिवरायाच्या जीवनाची शिल्पकार व मार्गदर्शक व स्वराज्याची निर्माती व नेतृत्व

करणारी म्हटले जाते.वीर कन्या, वीर पत्नी, वीर माता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आऊसाहेबांचे शिवाजी महाराजांच्या जडणघडणीतील योगदान लाखमोलाचे आहे.

**जिजाऊचा जन्म** :—१६ व्या शतकात महाराष्ट्र व दक्षिण भारत इस्लाममय होता याच सुमारास हिंदुवरिल अनन्वीत अन्याय अत्याचाराची परिसीमा गाठली होती त्यामुळे हिंदुंना सन्मानाने जीवन जगणे असाह्य झाले होते. याच सुमारास देवगिरीच्या यादव कुळात वऱ्हाडातील सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे १२ जानेवारी १५९८ मध्ये जिजाबाईचा जन्म झाला .जिजाबाईच्या वडीलांचे नाव लखुजी राजे जाधव व आईचे नाव म्हाळसाराणी होते जिजामातेचा जन्म हा भावी इतिहासाला कलाटणी देणारा ठरला जिजामातेचा विवाह इ.स.१६१० च्या सुमारास वेरूळच्या भोसले घराण्यातील शहाजी राजे यांच्याशी होऊन त्यांच्याच पोटी शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० मध्ये झाला. जिजामातेने स्वराज्य संस्थापनेचे नेतृत्व केले आणि सुपुत्र शिवाजी महाराज यांच्या हातून सुमारे ३५० वर्षानंतर महाराष्ट्रात मराठ्यांची सार्वभौम सत्ता ६ जुन १६७४ मध्ये स्थापन केली. जिजामातेने पारंपारिक मुळाक्षरे गिरविण्याचे—लिहण्या वाचण्याचे शिक्षण आपल्या पुरोहीता द्वारे प्राप्त केले.या शिवाय मुलकी आणि लष्करी शिक्षणाचे पाठ रूढी पंरपरेप्रमाणे आपल्या माता पित्या कडुन आणि घराण्याच्या पिढीजात लष्करी धंद्याच्या निरिक्षणातून आणि अनुभवातून प्राप्त करून घेतले.

**बालशिवबावरील संस्कार** :—बालमनावर मातेने केलेले संस्कार महत्वाचे मानले जातात बाल शिवबावर संस्काराचे नियोजन पूर्वक आणि जाणीव पूर्वक रोपण करणाऱ्या माता जिजाबाई ह्याच होत्या त्या शिवाजी महाराजांची स्फूर्ती,शक्ती गुरू व सर्वस्व होत्या.बालपणी शिवबाचा स्वभाव खोडकर, आडदंड आणि हुड होता या विषयी रियासतकार सरदेसाई म्हणतात ‘‘शिवाजीचा हुड स्वभाव पाहुन त्याला योग्य वळण दिले असता हा आपले व कुळाचे नाव उंचावेल असा भरवसा जिजाबाईला वाटू लागला बापाची(लखुजी राजे)व नवऱ्याची(शहाजी राजे)धोरणे व राजकारणे तिला माहीती होती.ती सर्व तिने बालशिवाजीला समजावून दिली त्यामुळे हिमतीचे कार्य करण्याचा हुरूप त्याचे ठिकाणी उत्पन्न झाला.’’जिजाऊनेच शिवाजीला पराक्रमी पुरूषाच्या गोष्टी सांगून आणि तुकारामाचे अभंग शिकवून त्याला धाडस, शौर्य, समता व उदारता यांची शिकवण दिली. जिजाऊने महादेव भट(महाभास)या पुरोहिताला शिवबांचा शिक्षक म्हणून नेमले होते.महादेव भटांनी बालशिवाजी राजांना मुळाक्षरे लिहणे—वाचणे शिकविले त्याकाळात शासकाला अनिवार्य शिक्षण म्हणजे युध्दकला;जिजाऊने लक्ष घालून संवगड्या सोबत धावणे, चढणे, कुस्ती, घौडदौड, दंडपट्टा, नेममारणे इत्यादी युध्दकलात बालशिवाजीला निष्णात बनविले.

**यवनी सत्तेबद्दल तिरस्कार**:—यवनी सत्तेच्या अन्याय अत्याचाराला पारावार राहीला नव्हता या सत्तेच्या राजवटीत जिजाऊचे पिता लखुजी जाधव बंधु अचलोजी व रघुजी भाचा यशंवतराव इत्यादींचे खून केले होते तसेच पतीला बेड्या ठोकल्या होत्या एवढेच करून यवनी शासक थांबले नाही तर या सत्तेत हिंदु मंदिराचा विध्वंस, मूर्त्याची विटंबना, गाईच्या कत्तली, ब्राम्हण व स्त्रीया भ्रष्ट केल्या जात होत्या या अत्याचारामुळे जिजाबाईचे मन पोळून गेले होते यावर त्यांना एकच उपाय दिसत होता तो म्हणजे स्वराज्य स्थापणे हे कार्य आपल्या पुत्राच्या हातून पार पाडावे ही त्यांची इच्छा होती करिता त्यांनी यवनी राजवटीचे खरे स्वरूप बालवयातच समजावून सांगून यवनी सत्तेबद्दलचा तिरस्कार त्यांच्या ठीकाणी निर्माण केला होता.

**स्वराज्य निर्मितीचे नेतृत्व व मार्गदर्शक**:शहाजीराजे हे विविध मुसलमानी सत्तेमध्ये चाकरी करित असतांना मुसलमानी सत्ताधाऱ्याकडून मिळणाऱ्या अपमानास्पद वागणूकीला कंटाळले होते. यातूनच त्यांच्या मनात स्वतंत्र्य राज्य स्थापण करण्याचे विचार येत होते हे विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी त्यांच्या कार्याची वास्तविकता तपासल्यास त्यांना स्वराज्याचे संकल्पक म्हणता येईल. शहाजी राज्यांनी संकल्पक या नात्याने पुध्याची जहागिरी शिवाजी महाराजांचे सहकारी, स्वतंत्र्य

ध्वज, संस्कृत मधिल शिक्का इत्यादी गोष्टी उपलब्ध करून देऊन शिवाजी व जिजाऊला पुणे जहागिरीत पाठविले होते यावरून शहाजी राजांनी स्वराज्याची पायभरणी केली जिजामातेने स्वराज्य निर्मीतीचे नेतृत्व व मार्गदर्शन केले व या माता पित्यांच्या कार्य आणि योगदानातून शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मीती केली असे म्हणता येईल.

**राज्यकारभार व राजनितीविषयी मार्गदर्शन:**शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापन करण्याचे कार्य हे आकाशाला गवसणी घालणारे होते.परंतु हे कार्य पार पाडण्या करिता जिजामातेने शिवरायांना वेळोवेळी राज्यकारभार व राजनितीविषयी केलेले मार्गदर्शन हे ही मोलाचे होते.महाराजांच्या बालपणी पुणे जहागिरीतील अनेक तंटयाचे निकाल त्यांनीच दिले होते तसेच महाराजांच्या गैरहजेरीत स्वराज्याचा कारभार सांभाळून कारभाराची घडी थोडी ही विस्कळित होऊ दिली नाही.एवढेच नव्हेतर संकट प्रसंगी शिवाजी महाराज हे मातेशी सल्लामसलत करूनच पुढिल व्युव्हरचना आखत, सारांश जिजामातेला राजकारभार व राजनितीची जाण होती.स्वाभावीकच या सर्व गोष्टीचा वारसा महाराजांना मिळाला होता त्यांनी मातेचे गुण अंगी बाणवून स्वराज्य निर्मीतीचे ध्येय गाठले.

**तंट्याचे निकाल:**न्यायक्षेत्रातील आऊसाहेबांचा अधिकार हा सर्वश्रेष्ठ तर होताच उलट त्या अत्यंत न्यायनिष्ठूर होत्या न्याय देतांना त्यांनी कधीही भेदभाव केला नाही तसेच खऱ्या व प्रामाणीक न्यायासाठी त्यांनी स्वपुत्र आणि मुतालीक दादाजी कोंडदेव यांचे निर्णयही बदलले गणोगबाजी तबीब याला पुणे परगण्या मधिल जमीन इनाम मिळाली होती परंतु शिवाजी महाराज्यांनी हे इनाम अमानत केले होते यासंदर्भात गणो गबाजीने आऊसाहेबांकडे तक्रार केल्यावर गबाजीच्या तक्रारीत तथ्य असल्याने आऊसाहेबांनी स्वपुत्राचा निर्णय रद्द करून गबाजीस न्याय मिळवून दिला.तसेच दादाजी कोंडदेव यांनी शिरवळच्या कुलकर्णीपदाचा(वतन)भाऊबंदकीचा निकाल दिला होता परंतु या निकालावर प्रतिवादी रामजी विठ्ठल देशमुख हा नाखुश असल्याने त्याने आऊसाहेबांकडे या संदर्भात तक्रार नोंदवली आऊसाहेबांनी त्याचे म्हणणे शांतपणे ऐकले व संपूर्ण तपासाअंती त्याच्यावर अन्याय झाल्याचे सिध्द झाल्यावर आऊसाहेबांनी त्याच्यावरील अन्याय दुर करण्याचा हुकूम दिला. यावरून आऊसाहेबांच्या न्यायनिष्ठूरतेची खात्री पटते हिच न्यायनिष्ठूरता पुढे शिवाजी महाराज्यांच्या अंगी आली त्यांच्या न्याय प्रियतेमुळे प्रजेचे कल्याण साधल्या गेले.

**मोहिमेची तयारी** :—नविनच स्थापन झालेल्या स्वराज्यावर एकाचवेळी शहिस्तेखान आणि सिद्दी जोहरची स्वारी या रूपाने दुहेरी संकट आले होते.तेव्हा शिवाजी महाराज हे सिद्दी जोहरने घातलेल्या पन्हाळा वेढ्यात पकडले गेले होते सिद्दीने दिलेला वेढा काही केल्या ढिला पडत नव्हता तसेच ढिला पडण्याची लक्षणेही दिसत नव्हती.यातच धुमाकुळ घालणाऱ्या शाहिस्तेखानाला लगाम कसा घालायचा?महारजांची संकटातून सुटका कशी करायची?या विचाराने जिजाऊ चिंताग्रस्त बनल्या होत्या परंतू संकट हे केवळ विचार करूनच निवारण होत नसते तर त्याला प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता असते हे लक्षात घेवून जिजाऊने पन्हाळा वेढा तोडण्यासाठी स्वनेतृत्वात मोहीम काढण्याचे ठरविले.सर्व मराठा सैनिकांना हुकूम सोडून लष्करी पोषाख परिधान करून लढण्याची सिध्दताही केली होती परंतु दरम्यानच बऱ्याच दिवसापासून थांगपत्ता नसलेला सेनापती पालकरचे अचानक राजवाड्यावर आगमन झाले तेव्हा जिजाऊचा वेष पाहून ते आवक् व शरमिंदे झाले वरील घटनेवरून जिजाऊस स्वराज्यरक्षणाचे व संकट निवारण्याची किती तळमळ होती हे दिसून येते.

**माणसे जोडण्याची हातोडी:**—स्वराज्याच्या प्रगती व बळकटीसाठी बदलत्या परिस्थितीनुसार बदलणे आवश्यक असते ही शिकवण जिजाऊंनी शिवाजी महाराजांना दिली होती गुंजन मावळचा विठोबा हैबतराव देशमुख अत्यंत शुर व कर्तबगार होता परंतु स्वराज्याशी फितुरी केल्याने तो जीवाच्या भितीपोटी रानोमाळ भटकत होता रानोमाळ भटकण्याचे जीवन त्याला असाह्य झाले होते तसेच आपल्या चुकीचा पश्चातापही झाला होता करिता त्याने गोमाजी नाईक मार्फत महाराजांकडे

अभयाचा कौल मागितला यासंदर्भात आऊसाहेबांनी पत्र लिहुन'तुम्ही सुखाने स्वराज्यात परत या तुमचे वाईट होणार नाही'अशी खात्री देऊन त्याच्या मनातील किल्मीष दुर केले एवढेच नव्हे तर पैशा अभावी विठोबाजीच्यामुलीचे लग्न सिध्दीस जात नसल्याने आऊसाहेबांनी आपल्या खाजगी खर्चातून २५ होण रोख व ५०० माणसांच्या जेवणाचे साहीत्य देऊन लग्न सिध्दीस नेले या मागे आऊसाहेब व महाराजांचे उदार धोरण हेच होते की,शरण आलेल्यास आश्रय आणि दिलेला शब्द पाळणे असे कृतीशिल धोरण होते.या धोरणामुळे जनतेचा स्वराज्यास पाठींबा मिळत होता.जनता स्वराज्यात सामील होऊन स्वराज्य कार्य म्हणजे आपलेच कार्य असे समजत होती ही भावना जनतेत निर्माण करण्यात जिजाऊ व शिवरायांचे धोरणच कारणीभूत होते अशी आऊसाहेबाजवळ माणसे जोडण्याची हातोडी होती.

**राज्यभिषेकाची प्रेरणा** :—स्थापन केलेल्या स्वराज्याला स्वतंत्र सार्वभौमत्व कायदेशीरपणा प्राप्त करण्यासाठी राज्यभिषेकाची नितांत आवश्यकता होती ती ओळखून शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्यभिषेक ६ जुन १६७४ मध्ये केला.अर्थात या राज्यभिषेका पाठीमागचा आग्रह व प्रेरणा जिजाऊंचीच होती तीन शाह्यांचे अन्याय, अत्याचार, बघितलेल्या जिजाऊच्या पुत्राने स्वतंत्र्य राज्य स्थापन करून स्वतंत्र्य राजा बनावे अशी महत्वकांशा होती हा जिजाऊचा संकल्प राज्यभिषेकानंतर पूर्णत्वास जाणार होता ही महत्वकांक्षा निस्सम मातृभक्त असलेल्या शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्यभिषेक करून पूर्ण केली.

**धर्म आणि निती** :—महाराजांच्या जीवनाला धर्म आणि निती याचे अधिष्ठान लाभले होते स्वधर्माचे रक्षण केले पाहीजे, धर्माचे पालन करणाऱ्यास विजय आणि अधर्माचे पालन करणाऱ्याचा नाश हे सुत्र जिजामातेने बाल शिवाजीच्या मनावर रामायण व महाभारत यामधील कथा सांगुन बिंबविले. जिजाबाईच्या या संस्कारमुळे साहित्याचार्य बाळाशास्त्री हरदास म्हणतात''दृढ धर्मनिष्ठा, दैवी गूढता,साधूसंताविषयी असीम श्रध्दा,साधेपणा व विशुध्द शिलचारीत्र ह्या देणग्या महाराजांना अलौकिक मातेकडुन मिळाल्या आहेत.''

**कठोर शिस्त** :—जिजामाता ह्या अत्यंत शिस्तप्रीय होत्या बेशिस्त वर्तन किंवा मोडलेली शिस्त त्या खपवून घेत नसत त्यांच्या शिस्तीची नोकर चाकरांवर चांगलीच जरब बसलेली होती.त्यामुळे कुणीही स्वकार्यात लांडो—लबाडी अथवा कुचराई करण्याची हिमंत करित नसे जिजाऊ ह्या जेवढ्या कडक शिस्तीच्या मोक्त्या होत्या तेवढ्याच त्या मायाळू व प्रेमळ होत्या.गरिबांच्या लग्नाप्रसंगी मदत करण्यात आणि दुसऱ्याचे संसार थाटण्यात त्यांना फार भुषण वाटत असे.रयतेच्या कल्याणासाठी सतत घटणे हे राजाचे कर्तव्य असते याची जान त्यांनी आपल्या कार्यातून शिवाजी राजांना करून दिली एकीकडे मातृत्वाचा सुखद वर्षाव करतांना शिस्तीची चौकट मोडणार नाही.या बाबतीत त्यांनी आपल्या पुत्राच्या बाबतीतही अत्यंत काळजी घेतली महाराजांच्या यशस्वी जीवनाचे मुख्यसूत्र स्वभिमान, कठोर शिस्त, विधायक विचार,नैतिकता आणि वक्तशिरपणा असे सांगता येईल हा वारसा खुद्द मातेकडुन महाराजांना मिळाला.

**मानवीय दृष्टिकोण** :—शिवाजी महाराजांच्या जीवनात अफझलखानाची भेट हा प्रसंग अतिशय महत्वाचा आहे.महाराज आणि खान यांची प्रतापगडाच्या पायथ्याशी भेट झाली असता खानाने महाराजांना विश्वास घाताने मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.त्याच क्षणी महाराजांनी आत्मसंरक्षण म्हणून प्राणांतिक जखम केली.नंतर महाराजांच्या अंगरक्षकांनी खानाचे शिर धडावेगळे केले नंतर ते शिर महाराजांनी जिजाबाईकडे पाठविले.जिजाबाईने खानाचे शिर सन्मापूर्वक प्रतापगडाच्या पायथ्याशी विधिवत दफन केले.आऊसाहेबाने आपल्या शत्रुच्या शिराची व्यवस्था सन्मानपूर्वक लावली यावरून जिजाऊचा मानवी दृष्टिकोन किती उच्च दर्जाचा होता हे स्पष्ट होते हाच मानवीय दृष्टिकोण शिवाजी

 **ISSN 2277-8063**

महाराजांनी प्रत्यक्ष कृतीने आचरणात आणला.

**निष्कर्ष :—**

१) आऊसाहेब यांनीच शिवाजी महाराजांच्या अंगी धाडस, शौर्य, समता व उदारता इत्यादी गुणंची रूजवणूक केली. यामूळेच शिवाजी महाराज हे स्वराज्य स्थापन करू शकले व स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करू शकले.

२) यवनी सत्तेबद्दल शिवाजी महारांजांच्या अंगी तिरस्कार निर्माण करण्याचे काम राष्ट्रमाता जिजाऊनेच पार पाडले.

३) राष्ट्रमाता जिजाऊला राजनिती व राज्यकारभार कसा चालवावा इत्यादींची जाण होती हा वारसा शिवाजी महाराजांना मिळाला परिणामी ते आपल्या स्वराज्याचा कारभार उत्कृष्टपणे चालवू शकले.

४) आई जिजाबाईची न्यायनिष्ठुरता शिवाजी महाराजांच्या अंगी आल्यामूळे ते प्रजेचे कल्याण साधू शकले.

५) माणसे जोडण्याची कला ह्या गोष्टी छ.शिवाजी महाराज हे जिजाऊ कडूनच शिकले.

६) शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्यभिषेक केला त्यामागची प्रेरणा व आग्रह हा आऊसाहेबांचा होता.

७) 'शिवचरित्र व स्वराज्य'ह्यांच्या मार्गदर्शक संकल्पक आधारस्तंभ शिल्पकार,प्रेरणास्थान ह्या माता जिजाऊच होत्या.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) आचार्य,(डॉ.धनंजय)— 'भारताचा इतिहास'साईनाथ प्रकाशन नागपूर २००६

२)देशमुख,मा.म. 'मध्ययुगीन भारतरचा इतिहास'विश्वभारती प्रकाशन नागपूर १९९८

३)पवार,(डॉ.जयसिंगराव) 'मराठी सत्तेचा उदय'निराली प्रकाशन,कोल्हापूर २००९

४)बाहेकर,डॉ.एस.ए. 'राजमाता—राष्ट्रमाता जिजाऊ'कसब प्रकाशन जळगाव २००७